# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

पमपा/पाकस/९९-२३/प्र.क्र. ४९/१९० /२०२३ दिनांक :३० /०१/२०२३

## जाहिर निवीदा सुचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ', 'ब', 'क', 'ड' मधिल अंदाजे १५२२० नळ कनेक्शन धारकांना पाणीपट्टी कराची देयके घरोघरी जाऊन वाटप करणेकामी तसेच अंदाजे २४२४ मिटर नळ कनेक्शन धारकांची त्रैमासिक मिटर रिडींग आणणे कामी जाहीर निवीदा सुचना प्रसिद्ध करून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी सदरची दरपत्रक दि. ३१/०१/२०२३ ते दि.०६/०२/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पाणी कर संकलन विभागाकडे सादर करावी. प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०७/०२/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मा उपायुक्त (कर) यांच्या दालनात उघडण्यात येतील. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेली दर पत्रके विचारात घेतली जाणार नाही. सदरच्या निविदेचा सविस्तर तपशील www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१) प्रथमपक्ष यांच्याकडून याकामीचा आदेश ठेकेदार यांना मिळाल्या पासून तीन दिवसाच्या आत ठेकेदार यांनी कामकाज सुरु करून कामकाजाचा दैनंदिन पुर्तता अहवाल प्रमुखांमार्फत कार्यालय नेमून देईल त्या विहित नमुन्यात सादर करावा.

२) वाटपासाठी प्राप्त होणारे देयक त्या नमूद पत्यावरच व संबंधित नळ कनेक्शन धारकांलाच दिले जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच वाटप झालेले प्रत्येक पाणीपट्टी देयक कार्यालयीन प्रतीवर संबंधित नळ कनेक्शन धारकांची पोहचदाखला दिनांकासह स्वाक्षरी व मोबाईल क्रमांक घेणेत यावा. त्याशिवाय त्या देयकाचे वाटप झाल्याचे ग्राह्य धरले जाणार नाही.

३) पाणीपट्टी देयक वाटपाकरीता ३० दिवसांचे पेक्षा जास्त कालावधी झाल्यास मुदतीत देयक वाटप करणे ठेकेदार यांच्यावर बंधन कारक राहील. अन्यथा विहीत मुदतीनंतर प्रति दिन रक्कम रु.१०००/- प्रमाणे विलंब शुल्क ३१ मार्च पर्यंत आकारले जाईल तसेच पाणीपट्टी देयके वाटप दिलेल्या मुदतीत न केल्यास देयकांवरील लागणाऱ्या शास्तीस ठेकेदारांस जबाबदार धरण्यात येईल.

४) पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ', 'ब', 'क', 'ड' मधील मिटर नळ कनेक्शन धारकांचे दर तिन महिन्यांनी मोबाईल जीपीएस मॅपिंगव्दारे मिटर रिडींग आणून त्याचे फोटो व मिटर रिडींगची नोंद केलेली नोंदवही सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.

५) वाटपासाठी पाणीपट्टी देयके प्राप्त झाल्यानंतर त्यांचे जलद गतीने वाटप करावे व त्यात कोणतेही अवाजवी बिलंब होणार नाही या बाबत दक्षता घ्यावी.वाटपासाठी अवाजवी विलंब होत असल्यास किंवा वाटपाचे कामामध्ये ईतर गंभीर तृटी आढळून आल्यास किंवा करारनाम्यातील अटि व शर्तीचे उल्लघंन झाल्यास सदर कामी दिलेला ठेका चालू ठेवणे अगर बंद किंवा रद्द करणेचा पुर्ण अधिकारी महानगरपालिकेला राहील व याकामी त्यांचा निर्णय अंतिम राहील.

६) नागरीकांना वापट करण्यात आलेल्या पाणीपट्टी देयकांबाबत तक्रार झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

Scanned with CamScanner

७) केलेल्या कामाचे मागणी बिल सादर करताना प्रत्यक्ष नळ कनेक्शन धारकांना बजावीण्यात आलेल्या पाणीपट्टी देयकांची पोहोच प्रत सादर करावी . त्यावर संबंधित भाग प्रमुखांचा स्वअभिप्रायसह अहवाल घ्यावा.

८) सदरच्या कामाकरीता आपणाकडून नियुक्त करणेत आलेल्या कामगारास ओळख प्रत्र देणे बंधनकारक राहील. कामगार नियुक्त करताना तो कमीत कमी ७ वी पास व चांगली वर्तवणुक असणे आवश्यक आहे.

९) सदर कामगारांना प्रति मागणी बिल अथवा किमान वेतन कायद्यानूसार जी अधिकची रक्कम असेल ती देणे आपणावर बंधनकारक असेल.

१०) सदर कामी आपणांकडून नियुक्त कामगारांना पाणीपट्टी देयक वाटप करताना अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

११) पुरविण्यात येणारी सेवा / साहित्य सक्षम प्राधिकरणांकडून महानगरपालिकेने तपासणी करणेचे ठरविल्यास ठेकेदाराने ते करणे बंधनकारक राहील व त्या बाबत प्राप्त् अहवाल्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेत येईल.याबाबतचे अंतिम अधिकार महागनरपालिकेला राहतील.

१२) साहित्य पुरविणे/ सेवा पुरविणे याबाबत कामगार कायद्याची पुर्तता करणेची जबाबदारी संपुर्णपणे ठेकेदाराची राहील जसे कामगार पुरविणे परवाना, किमान वेतन प्रमाणे वेतन प्रदान करणे,कामगारांचा विमा, त्यांचे भ.नि.नि.च्या रकमा जमा करणे ईत्यादी बाबत कोणताही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्यास संबंधीत ठेकेदार जबाबदार राहील.

१३) वार्षिक निवीदा या सर्वसाधारणपणे १ वर्षाकरीता असतील परंतु काही कारणास्तव पुढील निवीदा मंजुरीस उशीर झाल्यास त्याच मंजुर दराने देयक वाटप करणे/ रिडींग आणने संबंधीत ठेकेदारवर बंधनकारक राहील.

१४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय १९४९ नूसार महाराष्ट्र लेखा सहिता अधिनियम २०१३ व शासनाच्या नियम, आदेश, परिपत्रके,उपविधी ठेकेदारांस बंधनकारक राहतील.

(गणेश शेटे)
उपायुक्त (कर)
पनवेल महानगरपालिका

Scanned with CamScanner